Ref : D Poly/DES/2019 Date : 05/8/2019

## 3 ऑगस्ट – संस्था स्थापना दिवस

## धरमपेठ पॉलिटेक्निक येथे 'सामाजिक जाणीव दिवस

- धरमपेठ शिक्षण संस्थेच्या धरमपेठ पॉलिटेक्निक येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही दि. 3 ऑगस्ट 2019 रोजी धरमपेठ शिक्षण संस्थेचा स्थापना दिवस ' "जेष्ठ नागरिकांचे समाजातील योगदान आणि आवश्यकता या विषयाच्या अनुषंगाने सामाजिक जाणीव दिन' साजरा करण्यात आला.
- सर्व विभागातील कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी कॉलेज परिसरात वृक्षारोपण केले.
- धरमपेठ पॉलिटेक्निक गव्हर्निंग बोर्डचे अध्यक्ष श्री सुरेश देव, प्रमुख आमंत्रित वक्त्या अंजुमन पॉलिटेक्निकच्या फिजिक्स विषयाच्या प्रो. लीना गहाणे, धरमपेठ पॉलिटेक्निचे प्राचार्य श्री पारस पळसटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन केल्यानंतर श्री विनय मोडक यांना कार्यक्रमाचे संचालन करताना धरमपेठ शिक्षण संस्थेचा संपूर्ण इतिहास आणि वाटचाल हया बद्दल माहिती दिली.
- मा. पाचार्य श्री पारस पळसटकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना हया दिवसाचे प्रयोजन आणि आतापर्यंत सामाजिक जाणिव दिवसाचे निमित्ताने धरमपेठ पॉलिटेक्निक येथे राबविले गेलेले विविध उपक्रम याबाबत माहिती दिली.
- विद्यार्थ्यांनी संस्था समूह गीत सादर केले.
- धरमपेठ पॉलिटेक्निक येथे सर्व कर्मचा–यांनी आपल्या परिचयातील जेष्ठ नागरीकांना निंमंत्रित केले होते. विरंगुळा जेष्ठ नागरिक मंडळ, सहकार नगर नागपूर येथील श्री डोंगरे यांनी उपस्थितांना नागरिक मंडळाची माहिती दिली आणि जेष्ठ नागरिकांची समाजातील भूमिका त्यांनी मांडली.
- धरमपेठ पॉलिटेक्निच्या प्रतिनिधी या नात्याने सौ स्नेहल खंडागळे यांनीही या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली.
- कार्यक्रमाच्या मुख्य पाहूण्या राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख अधिारापदावर असलेल्या डॉ. प्रो लीना गहाणे यांनी "जेष्ठ नागरिकांचे समाजातील योगदान आणि आवश्यकता" विविध उदाहरणांद्वारे हया विषयावर मार्गदर्शन केले.
- कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रो. मीता फडणवीस यांनी केले. सूत्र संचालन श्री विनय मोडक यांनी केले.
- पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्राचार्य
धरमपेठ पॉलिटेक्निक, नागपूर